सोप्या भाषेत

# "अ‍ॅट्रॉसिटी कायदा: तक्रार, प्रक्रिया, हक्क, गैरवापर आणि संरक्षण"

हा ग्रंथ अत्याचाराविरोधातील तुमचा विश्वासार्ह मार्गदर्शक आहे. FIR कशी दाखल करायची, पोलीस तक्रार घेत नसतील तर काय करायचे, Zero FIR, पुरावे कसे जपायचे, अटक-जामीन प्रक्रिया, विशेष न्यायालयातील खटल्याचा प्रवास आणि पीडिताचे हक्क हे सर्व सोप्या व व्यवहार्य भाषेत समजावून सागितले आहे.

हे पुस्तक केवळ कायद्याची माहिती देत नाही; तर न्यायासाठी उभे राहण्याचा आत्मविश्वास देते.

तक्रार करा. पुरावे जपा. कायदा वापरा. अन्यायाला थांबवा.

---

📌 पुस्तकातील ठळक मुद्दे.

- एकाच पुस्तकात: कायदा+ प्रक्रिया+ तक्रार संपूर्ण मार्गदर्शन.
- FIR ते विशेष न्यायालय: तक्रार दाखल ते निकालापर्यंत संपूर्ण प्रक्रिया.
- FIR घेत नसतील तर कायदेशीर मार्ग.
- जातीवर आधारित पुराव्यांवर विशेष भर.
- अटक व जामीन प्रक्रिया.
- पीडिताचे हक्क, संरक्षण व नुकसानभरपाई.
- साक्षीदार संरक्षण व वकिलांची भूमिका.
- खोट्या तक्रारी: परिणाम व बचावाचे उपाय.
- प्रॅक्टिकल टेम्पलेट्स व FIR.

25/-

लेखक:

अ‍ॅड.अजय सुनील माने
(B.A.LLB.LLM)

कायद्याचं आणि फायद्याचं

अ‍ॅड.श्रुतिका मोहन गोचडे
(B.A.LLB)

## “ॲट्रॉसिटी कायदा: तक्रार, प्रक्रिया, हक्क, गैरवापर आणि संरक्षण”

**हा ग्रंथ अत्याचाराविरोधातील तुमचा विश्वासार्ह मार्गदर्शक आहे. FIR कशी दाखल करायची, पोलीस तक्रार घेत नसतील तर काय करायचे, Zero FIR, पुरावे कसे जपायचे, अटक-जामीन प्रक्रिया, विशेष न्यायालयातील खटल्याचा प्रवास आणि पीडितांचे हक्क हे सर्व सोप्या व व्यवहार्य भाषेत समजावून सांगितले आहे.**

**हे पुस्तक केवळ कायद्याची माहिती देत नाही; तर न्यायासाठी उभे राहण्याचा आत्मविश्वास देते. तक्रार करा. पुरावे जपा. कायदा वापरा. अन्यायाला थांबवा.**

---

## 📖 मुख्य प्रस्तावना: पुस्तकाचा आशय

**समाजात जाती, जमात, लिंग, सामाजिक स्थिती किंवा इतर कारणांवरून होणारा अन्याय आजही अनेक ठिकाणी दिसून येतो. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील (SC/ST) व्यक्तींवर जातीच्या ओळखीवरून अपमान, धमकी, मारहाण, सामाजिक बहिष्कार किंवा हक्कांपासून वंचित ठेवण्याचे प्रकार घडतात. अशा घटनांमुळे पीडित व्यक्ती शारीरिकच नव्हे तर मानसिकदृष्ट्याही खचून जाते. अनेक वेळा भीती, दबाव, सामाजिक लाज किंवा कायदेशीर प्रक्रियेची माहिती नसल्यामुळे पीडित तक्रार करण्यास मागे राहतो. परिणामी, अन्याय करणाऱ्यांना मोकळीक मिळते.**

**अशा परिस्थितीत पीडित व्यक्तींना संरक्षण देण्यासाठी आणि जातीवर आधारित अन्याय रोखण्यासाठी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा लागू करण्यात आला आहे. या कायद्यानुसार अत्याचाराचे प्रकार दखलपात्र गुन्हे मानले जातात, पोलिसांना FIR नोंदवणे बंधनकारक आहे, आणि पीडितांना संरक्षण, मदत व नुकसानभरपाई देण्याची तरतूद आहे. मात्र कायदा असला तरी त्याचा योग्य वापर कसा करायचा, तक्रार कुठे आणि कशी दाखल करायची, FIR नोंद झाली नाही तर काय करायचे याची माहिती सर्वसामान्य नागरिकांना अनेकदा नसते.**

**हे पुस्तक “अत्याचार प्रकरणात तक्रार कशी दाखल करावी?” या प्रक्रियेचा सोपा, टप्प्याटप्प्याने मार्गदर्शक देण्यासाठी तयार केले आहे. FIR पासून ते तपास, विशेष न्यायालयातील खटला, पीडितांचे हक्क, पुरावे कसे गोळा करावेत, आणि अडचणी आल्यास कायदेशीर उपाय हे सर्व विषय साध्या भाषेत, उदाहरणांसह समजावून सांगण्याचा उद्देश आहे. या मार्गदर्शकामुळे पीडित व्यक्ती किंवा त्यांच्या कुटुंबीयांना योग्य वेळी योग्य पाऊल उचलता येईल आणि न्याय मिळवण्याचा मार्ग अधिक सोपा होईल.**

**थोडक्यात सांगायचे तर, अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे हा तुमचा हक्क आहे. योग्य माहिती आणि योग्य प्रक्रिया माहित असल्यास अत्याचाराविरुद्ध लढणे शक्य होते. हे पुस्तक त्या लढ्यात तुमचा मार्गदर्शक ठरेल.**

---

## 🎯 Objectives (उद्दिष्टे)

---

1. **पीडितांना सक्षम करणे** – अत्याचार झाल्यास कायदेशीररीत्या तक्रार कशी करावी याची स्पष्ट माहिती देणे.
2. FIR **प्रक्रिया सोपी करणे** – FIR/Zero FIR कशी दाखल करावी हे टप्प्याटप्प्याने समजावणे.
3. **पोलीस नकारावर उपाय सांगणे** – FIR नोंद न झाल्यास उपलब्ध कायदेशीर पर्याय समजावणे.
4. **पुरावे जतन करण्याची जाणीव निर्माण करणे** – पुरावे कसे गोळा व सुरक्षित ठेवावेत याबाबत मार्गदर्शन.
5. **न्यायालयीन प्रवास समजावणे** – तपासापासून विशेष न्यायालयातील खटल्यापर्यंतची प्रक्रिया सोप्या भाषेत मांडणे.
6. **पीडितांचे हक्क अधोरेखित करणे** – संरक्षण, नुकसानभरपाई व कायदेशीर मदतीबाबत जागरूकता वाढवणे.
7. **भीती व गैरसमज दूर करणे** – कायद्याबाबतचे मिथ्स दूर करून आत्मविश्वास वाढवणे.

---

## 📌 पुस्तकातील ठळक मुद्दे

- **एकाच पुस्तकात: कायदा + प्रक्रिया + तक्रार संपूर्ण मार्गदर्शन.**
- **FIR ते विशेष न्यायालय: तक्रार दाखल ते निकालापर्यंत संपूर्ण प्रक्रिया**
- **FIR घेत नसतील तर कायदेशीर मार्ग**
- **पुरावे जातीवर आधारित पुराव्यांवर विशेष भर**
- **अटक व जामीन प्रक्रिया**
- **पीडितांचे हक्क, संरक्षण व नुकसानभरपाई**
- **साक्षीदार संरक्षण व वकिलांची भूमिका**
- **खोट्या तक्रारी: परिणाम व बचावाचे उपाय**
- **प्रॅक्टिकल टेम्पलेट्स व FIR अर्ज**

---

# लेखक

**श्रुतिका मोहन गोचडे** **अजय सुनील माने**

**संपर्क:**

: ७२६३८८९२९२

: कायद्याचं आणि फायद्याचं

ईमेल: asconsultancy69@gmail.com


---

कायद्याच आणि फायद्याच

## अनुक्रमणिका (Index)

**अत्याचार प्रकरणात तक्रार कशी दाखल करावी?**
FIR **पासून विशेष न्यायालयीन प्रक्रियेपर्यंत संपूर्ण मार्गदर्शक** (SC/ST Atrocities Act)


1. प्रस्तावना – अत्याचार कायद्याची पार्श्वभूमी व उद्देश
2. अत्याचार म्हणजे काय? – SC/ST कायद्यानुसार सोपी व्याख्या
3. अत्याचाराचे प्रकार – अत्याचार कायद्यानुसार दखलपात्र गुन्हे
4. कोण तक्रार करू शकतो? – अत्याचार कायद्यानुसार अधिकार
5. FIR म्हणजे काय? – अत्याचार प्रकरणांत महत्त्व
6. FIR कशी दाखल करावी? – अत्याचार कायद्यानुसार स्टेप-बाय-स्टेप प्रक्रिया (Zero FIR सहित)
7. पोलीस तक्रार नोंदवत नसतील तर काय करावे? – अत्याचार कायद्यातील उपाय
8. FIR नंतर काय होते? – प्राधान्य तपास व विशेष तरतुदी
9. तपास (Investigation) प्रक्रिया – विशेष अधिकारी व वेळेत तपास
10. पुरावे कसे गोळा करावेत? – जातीवर आधारित पुराव्यांवर भर
11. अटक आणि जामीन प्रक्रिया – अत्याचार कायद्यानुसार कठोर निकष
12. चार्जशीट म्हणजे काय? – आरोपपत्र व विशेष न्यायालयात सादरीकरण
13. विशेष न्यायालयातील न्यायालयीन प्रक्रिया – खटल्याचा टप्प्याटप्प्याने प्रवास
14. पीडितांचे हक्क, संरक्षण व नुकसानभरपाई – अत्याचार कायद्यानुसार
15. साक्षीदारांचे महत्त्व व संरक्षण – दबावापासून संरक्षणाचे उपाय
16. सरकारी वकील व पीडिताचा खाजगी वकील – भूमिका व समन्वय
17. वेळ, खर्च आणि मानसिक तयारी – वास्तववादी मार्गदर्शन
18. खोट्या तक्रारीचे परिणाम – कायदेशीर परिणाम व खबरदारी

18A. खोटी अत्याचार (SC/ST) तक्रार झाल्यास आरोपी व्यक्तीने काय करावे? – कायदेशीर उपाय व संरक्षण

19. अत्याचार कायदा व संबंधित महत्त्वाचे कायदे – IPC, CrPC, IT Act, POCSO इ.
20. निष्कर्ष व मार्गदर्शन – न्यायापर्यंतचा प्रवास: काय करावे, काय टाळावे




## अत्याचार म्हणजे काय? SC/ST कायद्यानुसार सोपी व्याख्या

**अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा**नुसार, SC/ST समाजातील व्यक्तींवर **त्यांच्या जात/जमातीच्या ओळखीवरून** जाणीवपूर्वक अपमान, छळ, हिंसा, धमकी किंवा हक्कांपासून वंचित ठेवणे म्हणजे "अत्याचार" होय. साध्या शब्दांत, **कोणालाही फक्त तो/ती SC किंवा ST आहे म्हणून त्रास देणे हा अत्याचार आहे.**

अत्याचारामध्ये फक्त मारहाणच येत नाही. **जातीवाचक शिवीगाळ करणे, सार्वजनिक ठिकाणी अपमान करणे, पाणी/रस्ता/मंदिर यांसारख्या सार्वजनिक सुविधांपासून दूर ठेवणे, जमीन किंवा घरावरून हाकलून देणे, धमकावणे, सामाजिक बहिष्कार टाकणे** असे प्रकारही अत्याचारात मोडतात. कायद्यानुसार अशा कृत्यांना गंभीर गुन्हा मानले जाते.